# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/आस्था/1484/2025-26 दि. 21 / 08/2025

प्रति,
जनसंपर्क अधिकारी,
जनसंपर्क विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील गट-क संवर्गातील रिक्त पदांची सरळसेवेने पदभरती करणेबाबतची जाहीरात जाहीर वृत्तपत्रात प्रसिध्द करणेबाबत.

मिरा भाईदर महानगरपालिका आस्थापनेवरील गट-क संवर्गातील 358 रिक्त पदांची सरळसेवेने पदभरती करणेबाबत मा.आयुक्त महोदय यांनी दि.20/08/2025 रोजी मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार गट-क संवर्गातील 358 रिक्त पदांची सरळसेवेने पदभरती करणेबाबतची जाहीरात 03 राज्यस्तरीय व 02 स्थानिक जाहीर वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत - जाहीरात

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, ४०१ १०१.
दुरध्वनी क्र. २८१९२८२८/२८१९३०८७.

जा.क्र.मनपा/आस्था/१४८४/२०२५-२६

दि. २१/०८/२०२५

**गट-क मधील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी जाहिरात**

मिरा महानगरपालिका आस्थापनेवरील गट-क मधील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. प्रस्तुत जाहिरातीमध्ये पदे हि प्रशासकीय सेवा, लेखा सेवा, लेखापरिक्षण सेवा, अभियांत्रिकी सेवा, तांत्रिक सेवा, अग्निशमन सेवा, शिक्षण सेवा, उद्यान सेवा, सार्वजनिक आरोग्य सेवा, निमवैद्यकीय सेवा, इत्यादी सेवेमधील आहेत, भरती प्रक्रियेत तुलनात्मक स्पर्धा होण्यासाठी पुरेसे उमेदवार असणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर निवेदनाद्वारे कळविण्यात येते की, जाहिरातीनुसार गट-क संवर्गामधील एकूण ३५८ पदांकरीता अर्ज करण्याचा कालावधी दि.२२/०८/२०२५ रोजी १७.०० पासून ते दि.१२/०९/२०२५ या दिवशी २३.५५ वाजेपर्यंत आहे. जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक अर्हता व इतर बाबीची पूर्तता करणाऱ्या पात्र व इच्छूक उमेदवारांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in अधिकृत संकेतस्थळावर दि.१२/०९/२०२५ रोजी २३.५५ वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावेत, विविध संवर्गातील भरावयाच्या पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी (७ वा वेतन) | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | S-१३ ३५४००-११२४०० | २७ |
| २. | कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) | S-१३ ३५४००-११२४०० | ०२ |
| ३. | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | S-१३ ३५४००-११२४०० | ०१ |
| ४. | लिपीक टंकलेखक | S-६ १९९००-६३२०० | ०३ |
| ५. | सर्व्हेअर (सर्वेक्षक) | S-८ २५५००-८११०० | ०२ |
| ६. | नळ कारागीर (प्लंबर) | S-६ १९९००-६३२०० | ०२ |
| ७. | फिटर | S-६ १९९००-६३२०० | ०१ |
| ८. | मिस्त्री | S-६ १९९००-६३२०० | ०२ |
| ९. | पंप चालक | S-६ १९९००-६३२०० | ०७ |
| १०. | अनुरेखक | S-८ २५५००-८११०० | ०१ |
| ११. | विजतंत्री (इलेक्ट्रिशियन) | S-६ १९९००-६३२०० | ०१ |
| १२. | कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर)/संगणक प्रोग्रामर | S-१३ ३५४००-११२४०० | ०१ |
| १३. | स्वच्छता निरीक्षक | S-८ २५५००-८११०० | ०५ |
| १४. | चालक-यंत्रचालक | S-८ २५५००-८११०० | १४ |
| १५. | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | S-१३ ३५४००-११२४०० | ०६ |

| | | | |
|---|---|---|---|
| १६. | अग्निशामक | S-७ २१७००-६९१०० | २४१ |
| १७. | उद्यान अधिक्षक | S-१३ ३५४००-११२४०० | ०३ |
| १८. | लेखापाल | S-१३ ३५४००-११२४०० | ०५ |
| १९. | डायलिसीस तंत्रज्ञ | S-१३ ३५४००-११२४०० | ०३ |
| २०. | बालवाडी शिक्षिका | S-६ १९९००-६३२०० | ०४ |
| २१. | परिचारीका/अधिपरिचारिका (स्टाफ नर्स/नर्स मिडवाईफ) (G.N.M) | S-१३ ३५४००-११२४०० | ०५ |
| २२. | प्रसविका (ऑक्झिलरी नर्स मिडवाईफ) (A.N.M) | S-८ २५५००-८११०० | १२ |
| २३. | औषध निर्माता/औषध निर्माण अधिकारी | S-१० २९२००-९२३०० | ०५ |
| २४. | लेखापरीक्षक | S-१३ ३५४००-११२४०० | ०१ |
| २५. | सहायक विधी अधिकारी | S-१४ ३८६००-१२२८०० | ०२ |
| २६. | तारतंत्री (वायरमन) | S-६ १९९००-६३२०० | ०१ |
| २७. | ग्रंथपाल | S-१३ ३५४००-११२४०० | ०१ |
| | **एकुण** | | **३५८** |

➢ **ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक** :-

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन पध्दतीने अर्ज नोंदणी सुरु होण्याचा दिनांक | दि.२२/०८/२०२५ रोजी (१७.०० पासून) |
| २. | ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि.१२/०९/२०२५ रोजी (२३.५५ पर्यंत) |
| ३. | ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरणेची अंतिम मुदत | दि.१२/०९/२०२५ रोजी (२३.५५ पर्यंत) |
| ४. | परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | परीक्षेपूर्वी ७ दिवस |
| ५. | ऑनलाईन परीक्षेचा संभाव्य दिनांक | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या http://www.mbmc.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असेल. |
| ६. | तांत्रिक समस्या उद्भवल्यास हेल्पलाईन नंबर | **मो.नं. ७३५३९४४४३६** |
| ७. | जाहिरातीमधील बाबीसंबंधी विचारणा करण्यासाठी हेल्पलाईन नंबर व ई-मेल आयडी | **०२२ – २८१९२८२८ / २८१९३०८७**<br>establishment@mbmc.gov.in |

➢ परीक्षेचा दिनांक, वेळ, केंद्र इत्यादी बाबी प्रवेशपत्रामध्ये नमूद केल्या जातील. संभाव्य बदलाबाबत वेळोवेळी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या http://www.mbmc.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करण्यात येईल.

➢ **परीक्षा शुल्क :-**

| गट | आकारण्यात येणारे शुल्क (वस्तु व सेवा करासहित) | | |
|---|---|---|---|
| | खुला प्रवर्ग | मागास प्रवर्ग व अनाथ प्रवर्ग | माजी सैनिक |
| गट क | रु.१०००/- | रु.९००/- | शुल्क माफ राहील |

१. अर्ज व परीक्षा शुल्क फक्त ऑनलाईन पध्दतीनेच भरणे आवश्यक आहे.

२. उमेदवारास प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील एकापेक्षा अधिक पदाकरीता अर्ज करावयाचे असल्यास अशा प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करुन त्यासाठी स्वतंत्र परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक राहील.

३. परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-Refundable) आहे. ऑनलाईन शुल्क भरतांना बँकेचे इतर शुल्क उमेदवाराला स्वतः भरावे लागतील. कोणत्याही कारणास्तव पदभरती प्रक्रिया स्थगित/रद्द झाल्यास उमेदवारास परीक्षा शुल्क परत करण्यात येणार नाही.

४. ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत/तपशिल तसेच ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर भेट देण्यात यावी. तसेच संवर्गनिहाय भरावयाची पदे, पदांचा तपशिल, वेतनश्रेणी, वयोमर्यादा/ वयोमर्यादा शिथिलता, निवड पध्दत, सर्वसाधारण सूचना, अटी व शर्ती, शैक्षणिक अर्हता, सामाजिक व समांतर आरक्षण तसेच आरक्षणाबाबत तरतुदी, पदनिहाय ऑनलाईन परीक्षा शुल्क, अर्ज भरणेबाबत मार्गदर्शक सूचना इत्यादी बाबतचा तपशिल मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या http://www.mbmc.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

o/c

(राधाबिनोद शर्मा, भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका